जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्रमांक :- २४५ दिनांक :- ०८/०९/२०२१

## गणेशोत्सव बंदोबस्ताकरिता मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस सज्ज.

दिनांक १०/०९/२०२१ ते १९/०९/२०२१ दरम्यान साज-या होणा-या गणेशोत्सवाच्या दृष्टीने मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीसांकडून पुर्वतयारी करण्यात आलेली आहे. सदर पुर्वतयारीचा भाग म्हणून कोविड-१९ च्या अनुषंगाने शासनाने जे निर्देश दिलेले आहेत त्यानुसार गणेशोत्सव साजरा होईल याबाबत गणेश मंडळाचे सदस्य, मुर्तीकार, ध्वनीक्षेपकाचे मालक यांच्यासोबत महानगरपालिका, अग्निशमन विभाग, विदयुत पुरवठा विभाग यांचे समन्वयाने बैठका घेण्यात आलेल्या आहेत. कोविड-१९ च्या संभाव्य तिस-या लाटेचा धोका लक्षात घेता आगामी गणेशोत्सव साध्या व घरगुती पध्दतीने साजरा करण्यात यावा याबाबत आवाहन करण्यात आले आहे.

पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये पोलीसांच्या वतीने एकुण ५१० कॉर्नर मिटींग घेण्यात आलेल्या आहेत. सदर मिटींग दरम्यान गणेश मंडळाचे सदस्य, स्थानिक व्यापारी व नागरिकांशी पोलीसांनी संवाद साधून गणेशोत्सवादरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच मागील गणेशोत्सवादरम्यान गुन्हे दाखल असणा-या व्यक्तींवर योग्य ती कायदेशिर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. ध्वनीक्षेपण कायदयाचे उल्लंघन होणार नाही याची खबरदारी घेवून त्यासाठी खास पथके नियुक्त करण्यात आले आहेत.

सर्व पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रात स्थानिक पोलीस, राज्य राखीव पोलीस दल, दंगा नियंत्रण पथक तसेच होमगार्ड यांचा योग्य तो बंदोबस्त संबंधीत पोलीस उपआयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली लावण्यात आलेला आहे. गणेशोत्सवादरम्यान शहरामध्ये सामाजिक माध्यमातून संदेश प्रसारित (व्हायरल) करून समाजात तेढ निर्माण होणार नाही यासाठी सायबर सेलची पथक तैनात करण्यात आली आहे. तसेच गणेशोत्सवादरम्यान एखादा अनुचीत किंवा संशयित प्रकार नागरिकांचे लक्षात आल्यास तात्काळ नजीकचे पोलीस ठाणे किंवा पोलीस आयुक्तालयाचे नियंत्रण कक्षाचा दुरध्वनी क्र ०२२-३५००६१३०, २९४५२१३५, ७०२१९९५३५२ व ७०२१९०९१०५ या क्रमांकावर संपर्क साधण्याबाबत नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे.